**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता

मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली

पोटेगांव रोड गडचिरोली – ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२ --  २३३३८२

email address : rpd.ee@mahapwd.com

# नागरीकांची सनद

# <u>सुची</u>


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ ते ४ |
| २ | कार्यालयाची बांधिलकी | ५ |
| ३ | नागरीकांची जबाबदारी | ५ |
| ४ | कार्यालयाची रचना | ५ ते ७ |
| ५ | परिशिष्ठ “ अ '' उपविभागाची नांवे / पत्ता व कार्यक्षेत्र विषयीची माहिती | ७ |
| ६ | परिशिष्ठ “ ब '' विभागीय कार्यालयाचा वृक्ष तक्ता | ८ |
| ७ | कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता | ९ |
| ८ | नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन | ९ ते १० |
| ९ | नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी | १० |

**१) प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास सुमारे १५० वर्षाची गौरवशाली परंपरा आहे. गडचिरोली जिल्हयाची स्थापना २६ ऑगष्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करून झालेली आहे. महाराष्ट्रातील उद्योग विरहीत तसेच सर्वात जास्त जंगलाखाली व आदिवासी बहुल असणारा गडचिरोली हा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा आहे. गडचिरोलीचे स्थान पूर्व महाराष्ट्रात विदर्भामध्ये असून जिल्हयाचे क्षेत्रफळ १४४७७ चौ.किमी.आहे. गडचिरोली जिल्याच्या सिमालगत भंडारा, गोंदिया, चंद्रपूर हे जिल्हे असून पूर्वेकडे छत्तीसगढ व दक्षिणेकडे आंध्रप्रदेश राज्याची सिमा जुडलेली आहे. जिल्हयाच्या पूर्व भागात सातनाला, टिप्पागड व चिरोली या पर्वत रांगा असून वैनगंगा, प्राणहिता, गोदावरी इंद्रावती हया प्रमुख नदया गडचिरोली जिल्हयातून वाहतात.

गडचिरोली जिल्हयातील कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग हे कार्यालय सन १९८३ पासून कार्यरत असून सद्यः हे कार्यालय गडचिरोली शहरातील सार्वजनिक बांधकाम परिसर पोटेगांव रोड गडचिरोली – ४४२६०५ या ठिकाणी कार्यरत आहे. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, गडचिरोली कार्यालयाकडून हा विभाग नागरीकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधीलकी कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली या सनदेद्वारे जाहिर करीत असून, ती स्विकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणुक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाईक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन, ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवला आहे. हया कार्यालयाकडून मुख्यत्वेकरून खालीलप्रमाणे कामे करण्यांत येतात.

१) अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, गडचिरोली कार्यालयाकडून गडचिरोली जिल्हयाअंतर्गत गडचिरोली चामोर्शी, धानोरा, अहेरी, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा, आरमोरी, वडसा, कुरखेडा, कोरची, मुलचेरा या तालुक्यांतील शासनाच्या विविध योजनांतर्गत प्रस्तावीत

(अ) नविन पुलांचे / रस्त्यांच्या कामांचे सर्वेक्षण करून सविस्तर सर्वेक्षण अहवाल (Detailed Survey Report) तसेच संरेखन नकाशे (Alignment Plan) तयार करणे.

(ब) अस्तीत्वातील पुलांचे रूंदीकरण, पुर्नबांधणी करण्याच्या कामासाठी सर्वेक्षण करून सविस्तर सर्वेक्षण अहवाल तयार करणे.

(क) अस्तीत्वातील रस्त्यांचे Grade Improvement करण्यासाठी सर्वेक्षण करून संरेखन नकाशे तयार करणे.

२) गडचिरोली जिल्हयांसाठी रस्ते विकास योजना (Road Development Plan) तयार करणे.

३) पुलांचे व रस्त्यांचे प्रकल्प तांत्रिकदृष्टया परिपूर्ण आर्थिकदृष्टया काटकसरीचे निकष लक्षांत घेउन जास्तीत जास्त लोकांना उपयुक्त होईल याची दक्षता घेणे.

४) विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्य व जबाबदा-या फलकावर जाहिर रित्या प्रदर्शित करणे.

५) **“ माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ ”** अंतर्गत विभागीय कार्यालयातील मागीतलेली माहिती संबंधितांना विहीत मुदतीत उपलब्ध करून देणे.

६) कार्यालयाच्या कामकाजात सातत्याने तत्परता ठेवून संगणककृती अद्यावती करणाद्वारे व नविन तंत्रज्ञानाने आधुनिकता आणून या विभागाची तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

७) विभागीय कार्यालय तसेच विभागाअंतर्गत उपविभाग संगणीकृत करून तातडीची माहिती स्थानिक भाषेत मराठीत त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

८) विभागाअंतर्गत अद्यावत माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या WWW.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध करणे.

९) नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

१०) या कार्यालयामध्ये सर्व अभिलेख अद्यावत करणे व त्यांची वर्गवारी करून अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

**२) मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली या कार्यालयाची बांधिलकी**

वरील सर्व कर्तव्य पार पाडतांना मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली हे

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेवून कामाचा वेळेत निपटारा व अंमलबजावणी करेल.

क) कार्यप्रणालीमध्ये गतिमानता प्रगतीद्वारे शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवून पारदर्शकता, निष्ठा व कर्तव्यपरायणता ठेवील.

**३) नागरीकांची जबाबदारी :-**

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणूक सयौजन्यपूर्वक असावी.

नागरीकांकडुन आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्णरित्या मिळावीत.

नागरीकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरू नये.

नागरीकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

नागरीकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

४)कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली या कार्यालयाची रचना :-

कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली या कार्यालयाचे अधिपत्याखाली (१) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१, गडचिरोली (२) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.२, गडचिरोली (३) मार्ग प्रकल्प उपविभाग आलापल्ली असे एकुण ३ उपविभाग कार्यरत आहेत. विभागीय कार्यालयातील क्षेत्रिय कामे या उपविभागाकडून पार पाडली जातात. कार्यकारी अभियंता हे विभागीय कार्यालयाचे प्रमुख आहेत. तर सहा.अभियंता श्रेणी-१/ उपअभियंता हे उपविभागाचे कार्यालय प्रमुख आहेत. कार्यकारी अभियंता यांचे आदेशानुसार सहा.अभि.श्रेणी-१ /उपअभियंता हे उपविभागाकडून कामाची अंमलबजावणी करतात. या उपविभागीय कार्यालयात शाखा अभियंता / सहा.अभि.श्रेणी-२ या पदावरील अधिकारी प्रत्यक्ष कामावर जावून देखरेख करतात. खात्याकडून करावयाच्या प्रत्येक सर्वेक्षणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करून त्यास मंजूरी मिळाल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्ये शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार कंत्राटदार निश्चित करण्यांत येतो. त्यानंतर निविदाशर्तीनुसार सर्वेक्षणाचे काम करून घेणे, झालेल्या कामाची मोजमापे लिहीणे अशी महत्वाची जबाबदारी या अधिका-यांवर असते.

शाखा अभियंता यांनी नोंदवलेल्या मोजमापाची तपासणी करून कामाची किंमत निर्धारण करण्याची कार्यवाही उप अभियंता यांचे कडून करण्यांत येते. सर्वेक्षणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करून ती सक्षम प्राधिका-यास मंजूरीसाठी सादर करण्याची जबाबदारी शाखा अभियंता व उप अभियंता यांची असते. या कामासाठी त्याना स्थापत्य अभियांत्रिकी सहा.व कुशल / अकुशल कामगार मदत करत असतात. या उपविभागाची नांवे / पत्ता व कार्यक्षेत्र विषयीची माहिती सोबतचे **परिशिष्ठ " अ "** मध्ये दर्शविली आहे.

विभागीय कार्यालयात प्रकल्प शाखा/तांत्रिक शाखा/ रेखा शाखा/ लेखा शाखा / आस्थापना शाखा / संगणक शाखा अशी शाखावार विभागणी केली आहे. विभागीय कार्यालयाचा वृक्ष तक्ता सोबतचे **परिशिष्ठ " ब "** मध्ये दर्शविला आहे.

## या शाखांचे प्रमुख अधिकारी / कर्मचारी खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | शाखा | प्रमुख अधिकारी | अधिकारी/कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | तांत्रिक शाखा | उप कार्यकारी अभियंता | शाखा अभियंता/ स.अ.श्रेणी-२/ कनिष्ठ अभियंता/स्था.अभि.सहा. |
| २ | रेखा शाखा | आरेखक | स्था.अभि.सहा./सहा.आरेखक / अनुरेखक. |
| ३ | लेखा शाखा | विभागीय लेखाधिकारी | वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ लिपीक |
| ४ | आस्थापना शाखा | प्रथम लिपीक | वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ लिपीक |
| ५ | भांडार शाखा | भांडारपाल | सहाय्यक भांडारपाल |
| ६ | संगणक शाखा | संगणक | टंकलेखक/ कनिष्ठ लिपीक |

# परिशिष्ठ " अ "

### उपविभागाची नांवे / पत्ता व कार्यक्षेत्र विषची माहिती

| अ.क्र. | उपविभागाचे नांव | उपविभागाचा पत्ता | उपविभागाचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१ गडचिरोली | सार्वजनिक बांधकाम परिसर पोटेगांव रोड गडचिरोली-४४२६०५ | गडचिरोली जिल्हयांअंतर्गत सा.बां .विभाग क्र.१ यांचे कार्यक्षेत्रात रस्ते व पुलांचे सर्वेक्षण करून संरेखन नकाशे तसेच सविस्तर सर्वेक्षण अहवाल (Detailed Survey Report) तयार करणे. |
| २ | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.२ गडचिरोली | सार्वजनिक बांधकाम परिसर पोटेगांव रोड गडचिरोली-४४२६०५ | गडचिरोली जिल्हाअंतर्गत सा.बां.विभाग क्र.२ गडचिरोली यांचे कार्यक्षेत्रातील रस्ते व पुलांचे सर्वेक्षण करून संरेखन नकाशे तसेच सविस्तर सर्वेक्षण अहवाल तयार करणे. |
| ३ | मार्ग प्रकल्प उपविभाग, आलापल्ली | सार्वजनिक बांधकाम संकुल आलापल्ली. | गडचिरोली जिल्हा अंतर्गत सा.बां. विभाग आलापल्ली यांचे कार्यक्षेत्रातील |

## मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग नागपूर

- नागपूर
- चंद्रपूर
- द.व गु.नि.मंडळ
- **सा.बां.मंडळ, गडचिरोली**
  - का.अ. मा.प्र.वि. गडचिरोली
  - का.अ. सा.बां.वि.क्र.१ गडचिरोली
  - का.अ. सा.बां.वि.क्र.२ गडचिरोली
  - का.अ. सा.बां.विभाग आलापल्ली

---

उपकार्यकारी अभियंता

- आरेखक → सहा.आरेखक
- भांडारपाल → सहाय्यक भांडारपाल
- प्रथम लिपीक →
  १) वेतन
  २) आस्था-१
  ३) आस्था-२
  ४) आस्था-३
  ५) आस्था-४
  ६) संगणक
  ७) आवक-जावक
  ८) शिपाई
  ९) चौकीदार

विभागीय लेखाधिकारी → निविदा → एस.ए.सी. → लेखापरिक्षक → संकिर्ण

१) उपविभाग मा.प्र.उपविभाग क्र.१ गडचिरोली

२) उपविभाग मा.प्र.उपविभाग क्र.२ गडचिरोली

३) उपविभाग मा.प्र.उपविभाग आलापल्ली

विभागीय कार्यालयात उपकार्यकारी अभियंता, विभागीय लेखाधिकारी, भांडारपाल, आरेखक सहा.आरेखक व प्रथम लिपीक हे अधिकारी कार्यकारी अभियंता यांचे सुचनांनुसार काम करतात. उपकार्यकारी अभियंता उपविभागीय कार्यालयास क्षेत्रिय कामे पार पाडण्यासाठी अंदाजपत्रकांची/ निविदा विषयक कागदपत्रांची छाननी करून त्यास सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करतात. पूर्ण झालेल्या कामांची नकाशे व कागदपत्रांवरून तपासणी करून मोजमापानुसार केलेले मुल्य निर्धारण तांत्रिकदृष्टया तपासून अदा करणेसाठी कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेतात. या शाखांकडून करण्यांत येणा-या कामाची सविस्तर माहिती स्वतंत्ररित्या स्पष्ट केली आहे.

विभागीय स्तरावर विवीध स्वरूपाचे लेखे (Accounts) तयार करण्याचे काम विभागीय लेखाधिकारी करत असतात. त्याच बरोबर कार्यकारी अभियंता यांना आर्थिक बाबींशी निगडीत असलेल्या प्रकरणी मार्गदर्शन करण्याचे काम हे अधिकारी करतात. भांडारपाल यांच्या कडून विभागीय भांडारासाठी लागणा-या साहित्य खरेदीविषयी कार्यवाही केली जाते. विभागीय कार्यालयाच्या आस्थापना शाखेकडून कर्मचा-यांच्या नियुक्त्या, बदल्या, रजा इत्यादी सेवा विषयक कामे केली जातात.

**५) वभागाअंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता.**

**अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | नव्याने प्रस्तावित करणेत आलेले रस्ते, इमारती व पूल यांचे सर्वेक्षण करणे. | कार्यकारी अभियंता तसेच उपअभियंता | ६० दिवस |
| २ | माहिती अधिकारात मागणेत आलेली माहिती | शासकीय माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासून ३० दिवसात |
| ३ | माहिती अधिकारांतर्गत प्राप्त अपिलीय अर्ज | अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासून ४५ दिवसात |

**ब) माहितीची सुलभता :-**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावरून (www.mahapwd.com) तसेच वेळोवेळी प्रसिध्द केले जाणा-या पत्रकाद्वारे जनतेला आकडेवारीचा तपशिल सुलभतेने उपलब्ध होईल. मुख्यत्वेकरून या संकेतस्थळावर निविदासुचना, परिपत्रके व कार्यालयांची माहिती दिली आहे.

**६) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन :-**

**अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब या अन्य काही गा-हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरीकांनी त्यांची गा-हाणी / तक्रार असेल त्या उपविभाग कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ उपविभागा संबंधीत गा-हाणे / तक्रार असल्यास उपविभाग कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे उप अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, विभाग कार्यालयासंबंधीत गा-हाणे / तक्रार असल्यास संबंधीत शाखा प्रमुखाकडे (उप कार्यकारी अभियंता / विभागीय लेखाधिकारी/ प्रथम लिपीक / भांडारपाल) गा-हाणे मांडावे. अशा गा-हाणे / तक्राकरींचे निराकरण करण्यांत येईल. गा-हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा ई-मेल द्वारेही नागरीक मांडू शकतात. या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा वेळोवेळी कार्यकारी अभियंता यांच्याकडून घेण्यांत येईल.

**ब) जनसामान्यांकडून सुचना :-**

ही नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमुल्य सुचनांच्या गांभिर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्वतःहुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरीकांना हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**७) नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी :-**

मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली अंतर्गत नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास विभागीय कार्यालय कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देउन नागरीकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथेचित आदर करून आवश्यकतेनुसार बदल करण्यांत येतील.

मार्ग प्रकल्प विभाग, गडचिरोली कार्यालय खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरीकांना संवेदनशीलन, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरीकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यांत येईल.

८) सार्वजनिक बांधकाम मंडळ, गडचिरोली यांनी सा.बा.मा.प्र.वि.गडचिरोली, उपविभाग क्र.१ व २ यांना इमारतीचे बांधकाम व उपविभाग क्र.३ आलापल्लीसह सा.बां.विभाग, आलापल्ली यांना बांधकामासाठी संलग्न करणे प्रस्तावित आहे. मंजुरी प्राप्त होताच या कार्यालयाचे कार्यक्षेत्र वाढतील.

# परिशिष्ठ “ ब ’’

विभागीय कार्यालयाचा वृक्ष तक्ता

उपकार्यकारी अभियंता

- आरेखक
  - सहा.आरेखक
- भांडारपाल
  - सहाय्यक भांडारपाल
- प्रथम लिपीक
  - १) वेतन
  - २) आस्था-१
  - ४) आस्था-२
  - ४) आस्था-३
  - ५) आस्था-४
  - ६) संगणक
  - ७) आवक-जावक
  - ८) शिपाई
  - ९) चौकीदार

विभागीय लेखाधिकारी

- निविदा
- एस.ए.सी.
- लेखापरिक्षक
- संकिर्ण

१) उपविभाग
मा.प्र.उपविभाग क्र.१
गडचिरोली

२) उपविभाग
मा.प्र.उपविभाग क्र.२
गडचिरोली

३) उपविभाग
मा.प्र.उपविभाग
आलापल्ली

विभागीय कार्यालयात उपकार्यकारी अभियंता, विभागीय लेखाधिकारी, भांडारपाल, आरेखक सहा.आरेखक व प्रथम लिपीक हे अधिकारी कार्यकारी अभियंता यांचे सुचनांनुसार काम करतात. उपकार्यकारी अभियंता उपविभागीय कार्यालयास क्षेत्रिय कामे पार पाडण्यासाठी अंदाजपत्रकांची/ निविदा विषयक कागदपत्रांची छाननी करून त्यास सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करतात. पूर्ण झालेल्या कामांची नकाशे व कागदपत्रांवरून तपासणी करून मोजमापानुसार केलेले मुल्य निर्धारण तांत्रिकदृष्टया तपासून अदा करणेसाठी कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेतात. या शाखांकडून करण्यांत येणा-या कामाची सविस्तर माहिती स्वतंत्ररित्या स्पष्ट केली आहे.